F/c

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**महत्त्वाचे - ईमेल / स्पीड पोस्टद्वारे** क्रमांक : १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/ ५४०

**स्मरणपत्र -** दिनांक : ०२/१२/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरित पूर्ण करण्याबाबत ......**

संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र :१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/२५५ दि. २८/०५/२०१९

**आपले सरकार डी.बी.टी पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रानुसार डीबीटी पोर्टलद्वारे योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यासाठी या कार्यालयाकडून ज्या विद्यार्थ्यांचे पोर्टलमार्फत देयक जनरेट करुन अधिदान व लेखा कार्यालयाकडून रक्कम मंजूर करुन** सेंट्रल पूल खात्यामध्ये **वितरणासाठी देण्यात आले आहे अशा विद्यार्थ्यांना,**

१) **त्यांच्या लॉगीनमध्ये पहिला** हप्त्याची रक्कम प्राप्त करण्यासाठी REDEEM ( रिडिम ) **बटनचा पर्याय प्राप्त होतो. असा पर्याय प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील त्यांच्या लॉगीन आयडीचा वापर करुन** REDEEM ( रिडिम ) **बटनवर क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पोर्टलमार्फत त्या विद्यार्थ्यांना योजनेच्या पहिला हप्त्याची रक्कम वितरणाची कार्यवाही सुरु होते.**

२) **तसेच,** ज्या विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त होते अशा **विद्यार्थ्यांचा लाभाचा दुसरा हप्ता मंजूर करण्यासाठी संस्थांना त्यांच्या** प्राचार्यांच्या **लॉगीन**आयडीद्वारे संबधीत **विद्यार्थ्यांची उपस्थिती** ( Student Attendance ) भरावी लागते त्यानंतरच **विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याच्या रक्कम वितरणाची कार्यवाही सुरु होते** व विद्यार्थ्यांना **योजनेच्या दुसऱ्या** हप्त्याची रक्कम प्राप्त करण्यासाठी उपलब्ध झालेल्या REDEEM **बटनवर क्लिक करणे आवश्यक** असते.

३) ज्या विद्यार्थ्यांनी पहिला / दुसरा हप्ता **प्राप्त करण्यासाठी** त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध असलेल्या Redeem Option Click **करण्याची** ( Use of Redeem Option ) **कार्यवाही** केलेली नाही अशा विद्यार्थ्यांची यादी **संस्थेच्या** प्राचार्यांच्या तसेच विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये Status wise Application Detail Report **अंतर्गत उपलब्ध** आहे. ( Voucher not Redeem) तसेच,

४) दुसरा हप्ता **प्राप्त करण्यासाठी** ज्या विद्यार्थ्यांची **उपस्थिती** ( Student Attendance ) **भरण्याची कार्यवाही** संस्था स्तरांवर प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांची यादी **संस्थेच्या प्राचार्यांच्या तसेच विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये** Status wise Application Detail Report **अंतर्गत उपलब्ध** आहे. ( Pending at Institute for II Installment )

संदर्भीय पत्रान्वये / Orientation Prorgramme मध्ये / या कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये कळविल्यानुसार उपरोक्त बाब सर्व विभागीय कार्यालयांना संस्थांनां कळविण्यासाठी सूचित केलेले आहे. तरी आज रोजीदेखील काही विद्यार्थी / संस्था यांचेकडून उपरोक्त कार्यवाही प्रलंबित राहात आहे ज्याची अद्ययावत यादी संस्था / विभागीय कार्यालय यांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध आहे.

या पत्राद्वारे पुन:श्च सर्व विभागीय कार्यालयांना अंतिम सूचना देण्यात येते की, **विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये** Status wise Application Detail Report **अंतर्गत वेळोवेळी उपलब्ध अद्ययावत यादीनुसार संस्था / विद्यार्थी स्तरांवरील प्रलंबित कार्यवाही** ( Voucher not Redeem, Pending at Institute for II Installment etc.) संस्था / विद्यार्थ्याकडून **पूर्ण करण्यासाठी आपल्या स्तरांवरुन** संबंधित **संस्थांना** विद्यार्थ्यांची **उपस्थिती** ( Student Attendance ) **भरण्याची कार्यवाही** तसेच संस्थामार्फत विद्यार्थ्यांना **विद्यार्थी स्तरांवरील प्रलंबित कार्यवाही** ( Voucher not Redeem) तात्काळ ( ३ दिवसांच्या आत ) **पूर्ण करण्याबाबत** कळविण्यात यावे **तसेच उपरोक्त कारणांमुळे जर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी** / संस्था **वंचित राहिल्यास तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी या संचालनालयाची न राहता, संबंधित संस्था व विद्यार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

( डॉ.अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
( लक्षवेध : श्री. संजय धारुरकर, अवर सचिव )
२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर . ( लक्षवेध : श्री. सं.वा. जाधव, कक्ष अधिकारी )
३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,५ वा मजला,मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई : ३२.